Scan QR code to visit... Epaper Portal

www. sahyandrinews.com

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १४२ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.२१ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

मराठा समाजाला १० टक्के आरक्षण

मुंबई–मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी आज महाराष्ट्र सरकारने विशेष अधिवेशन बोलवलं आहे. राज्यपालांचं अभिभाषण झालं की अधिवेशनाला सुरुवात होईल. आज या अधिवेशनात मराठा समाजाला १० टक्के आरक्षण मिळणार हे निश्चित झालं आहे. कारण सरकारने जो मसुदा आणला आहे त्यात १० टक्के आरक्षणाची तरतूद आहे. मराठा समाजाला शिक्षण आणि नोकरीत १० आरक्षण मिळणार असल्याची माहिती ANI ने दिली आहे. मराठा समाजाबाबत राज्य मागासवर्ग आयोगाने जे सर्वेक्षण केलं. त्याबाबत राज्य मागासवर्ग आयोगाने अहवाल तयार केला आहे. मराठा समाज हा राज्यभरात २७ टक्के असल्याचे न्या शुक्रे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मागासवर्गीय आयोगाला आढळून आले. सुमारे ५२ टक्के आरक्षण असणाऱ्या मोठ्या संख्येतील जाती व गट आधीच राखीव प्रवर्गात आहे. त्यामुळे राज्यातील २७ टक्के असलेल्या अशा मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गात ठेवणे पूर्णपणे असामान्य ठरेल अशी माहिती आयोगाने अहवालात दिली आहे.महाराष्ट्र शासनाने, आयोगाचा अहवाल, निष्कर्ष, अनुमाने व शिफारशी काळजीपूर्वकपणे विचारात घेतलेल्या आहेत आणि त्या स्वीकारलेल्या आहेत. मराठा समाजाशी संबंधित असलेले अहवालातील विविध पैलू, त्यात दिलेली अनुभवाधिष्ठित, परिमाणात्मक व समकालीन आधारसामग्री, तथ्ये व सांख्यिकी यांबाबत आयोगाने केलेल्या सर्वकष अभ्यासाच्या आधारे, शासनाचे असे मत आहे की,

मराठा समाज, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग आहे आणि भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२क (३) अन्वये असा वर्ग म्हणून विनिर्दिष्ट करण्यात यावा आणि संविधानाच्या अनुच्छेद १५(४), १५(५) व अनुच्छेद १६ (४) अन्वये त्या वर्गासाठी आरक्षण देण्यात यावे;

शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशांमधील आरक्षणात आणि लोकसेवा व पदे यांमधील आरक्षणात मराठा समाजाला ५० टक्क्यांपेक्षा अधिक मर्यादेत आरक्षण देण्यास प्राधिकार देणारी, आयोगाने नमूद केलेली अपवादात्मक परिस्थिती व असाधारण स्थिती अस्तित्वात आहे;

मराठा समाजाला, लोकसेवांमध्ये दहा टक्के आरक्षण आणि शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशांमध्ये दहा टक्के आरक्षण देणे आवश्यक व इष्ट आहे;

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या उन्नतीसाठी लोकसेवांमध्ये आणि भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांव्यतिरिक्त, इतर शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशांकरिता, आरक्षण देण्यासाठी कायद्याद्वारे विशेष तरतूद करणे इष्ट आहे.

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२क चे खंड (३) हे, राज्याच्या प्रयोजनांसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाची यादी तयार करण्यासाठी आणि ती ठेवण्यासाठी कायदा करण्याचा अधिकार, राज्याला प्रदान करते. राज्याला, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १५ (४), १५ (५) व १६ (४) या अन्वये शैक्षणिक संस्थांमध्ये व लोकसेवांमध्ये अशा वर्गास आरक्षण देण्याकरिता कायद्याद्वारे तरतूद करता येईल.ही वस्तुस्थिती विचारात घेता, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात, मराठा समाजाला, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग म्हणून विनिर्दिष्ट करण्यासाठी आणि अशा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या उन्नतीसाठी त्यांना, राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी जागांच्या आरक्षणाकरिता आणि राज्याच्या नियंत्रणाखालील सेवा व पदे यांमधील नियुक्त्यांसाठी पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किवा तदानुषंगिक बार्बीकरिता नवीन कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

केंद्रीय दारूगोळा भांडारात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती

पुलगाव । प्रतिनिधी

येथील केंद्रीय दारूगोळा भांडारात छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.पुलगावचे कमांडर ब्रिगेडियर कौशलेश पंघाल यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपकमांडर कर्नल संदीप शर्मा व सर्व अधिकारी यांनी समयोचित मार्गदर्शन केले.लष्करी व नागरीक, तिन्ही युनियनचे अध्यक्ष व उपस्थित सर्व शिवभक्तांनी श्रद्धांजली वाहिली. छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार संपूर्ण प्रतिष्ठानात घुमला.

चंद्रपूर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या अध्यक्षपदी सचिन साधनकर

माता महाकाली ग्रुप ऑफ इन्स्टिटच्यूट वरोरा चे अध्यक्ष सचिन दि.साधनकर यांची नुकतीच चंद्रपूर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, कबड्डी महर्षी बुवा साळवी यांनी कबड्डी खेळाला मोठ्या उंचीवर पोहोचवले आहे. या कबड्डी खेळाची लोकप्रियता आणखी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येईल तसेच युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यात येईल.या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय सेवा महाविद्यालय येथे शिवजयंती साजरी

कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक संलग्नित
शिवजयंती

वरोरा । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय सेवा महाविद्यालय सूर्ला वरोरा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रा.विनोद कोरडे यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध पैलूवर मार्गदर्शन केले .तसेच प्रमुख मार्गदर्शक प्रा. भारती पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच प्रा. दिपक खामनकर , प्रा. मनोज खंडाळकर, प्रा.झाडे हे उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी ऋतुजा मोडक तर आभार प्रदर्शन तन्वी ढवस यांनी केले. तसेच तुषार कडू, हर्षद ढवस, रमेश जीवतोडे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

चांदापूर येथे शिवजयंती महोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

मूल । प्रतिनिधी

चांदापूर येथे दिनांक १७ फेब्रुवारी २०२४ पासून शिवजयंती महोत्सव साजरा करण्यात आला. दिनांक १७ फेब्रुवारीला शिवगर्जना सांस्कृतिक,कला,क्रीडा व बहुउद्देशिय संस्थेतर्फे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आला होते .

त्याच दिवशी शालेय विद्यार्थ्यांच्या चित्रकला व सामान्यज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. दिनांक १८ फेब्रवारीला चांदापूर येथील ऐतिहासिक वारसा लाभलेली पायऱ्यांची विहीर ही अडगळीत पडलेली होती.त्या विहीरीची सफाई करून विहीरी सभोवती तारांची जाळी बसवण्यात आली.व दिनांक १९ फेब्रुवारीला दुपारी बारा वाजता विद्यार्थ्यांच्या तीन गटात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. त्यानंतर ठिक चार वाजता छत्रपती शिवाजी महाराजांची शोभायात्रा काढण्यात आली.या शोभायात्रेत शिवगर्जना संस्थे सोबतच संत तुकाराम महाराज प्रतिष्ठान व गुरुदेव सेवा मंडळाचे भजन मंडळी यांनी मिरवणूकीत दिंडी काढली.गावातील महिला लेझिम पथकांसह शोभायात्रेत सहभागी झाल्या त्याबरोबरच गावातील बहुसंख्य युवक,युवती,प्रतिष्ठीत व्यक्ती व शाळेतील विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले.शोभायात्रा दिड तास संपूर्ण चांदपूरमध्ये फिरवण्यात आली. त्यानंतर लगेचच दायीआई यांचा साडी देऊन व आशाताई यांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.त्याचबरोबर चित्रकला स्पर्धा, सामान्यज्ञान स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा व रांगोळी स्पर्धा यातील प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विध्यार्थ्यांचा मुमेंटो व प्रमाणपत्र आणि पुस्तक देऊन गौरविण्यात आले.त्याचप्रमाणे रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉअभिलाषा गावतुरे ,उदघाटक सोनीताई देशमुख सरपंच,अध्यक्ष खुशालराव शेरकी माजी सरपंच,विशेष अतिथी ज्ञानदेव अर्जूनकार, विनायकराव झरकर , गणपतराव पाल,मारोतराव शेरकी, राजु पोटे,वंदनाताई कोरेवार, वेणूताई चिंचोलकर,सुनिताताई कडूकार,ब्रम्हानंद मडावी,शामराव शेरकी, नवनित चिंचोलकर, ताराचंद शेडमाके,रविंद्र शेरकी,अनिल नैताम मुख्याध्यापक,सुरेश जिल्हेवार स.शि.प्रियंका वाळके,सिंधुबाई गेडाम, विद्याताई पोटे.यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडला.यासाठी दिलीप पाल,नंदकिशोर शेरकी,पंकज निशाने,सुरेश देशमुख,वसंत पोटे,देविदास देशमुख,अंकुश शेरकी,बंडू पोरटे, मनोज शेरकी,धर्मेंद्र घोगरे,अभिजित चिंचोलकर,दिवाकर केळझरकर, आशिष पाल, दुर्योधन कोहपरे, दिलीप पोटे,नितेश चिंचोलकर, दिनकर झरकर,धनराज निशाने, किशोर कडूकार,एश्वित शेरकी,रोशन पोरटे,कमलेश चुदरी,जय पाल,नागेंद्र घोगरे,शुभम देशमुख त्याचप्रमाणे शिवगर्जना बहुउदेशीय संस्था,संत तुकाराम महाराज प्रतिष्ठान,गुरुदेव सेवा मंडळाच्या सदस्यांनी सहकार्य केले .

शिवजन्मोत्सव सोहळा २०२४

‘झाडीपर्व’ या विशेषांकाच्या मुखपृष्ठाचे प्रकाशन

झाडीची कला जगभरात पोहोचावी–अभिनेत्री कुलकर्णी

मूल । प्रतिनिधी

सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न असलेल्या महाराष्ट्रात ग्रामीण भागातील कलावंत लोककला जोपासत असल्याने त्यांच्या कलेला वाव देणे गरजेचे आहे.कलाकार कितीही मोठा झाला तरी राजाश्रयाशिवाय मोठा होऊ शकत नाही,हे लक्षात घेऊन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ग्रामीण भागात झाडीपट्टी सांस्कृतिक कला महोत्सव आयोजित केले आहेत.त्यामुळे येत्या काळात झाडीपट्टी कला महोत्सव राज्यातच नव्हे,तर देशात साजरा झाल्याशिवाय राहणार नाही,असा विश्वास अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

सांस्कृतिक मंत्रालय व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक क्रीडासंकुल येथे आयोजित तीनदिवसीय झाडीपट्टी सांस्कृतिक महामहोत्सवाचे उद्घाटन सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.सांस्कृतिक मंचावर संमेलनाध्यक्ष पद्मश्री डॉ.परशुराम खुणे,ज्येष्ठ कवयित्री अंजना खुणे,अभिनेता अक्षय कुलकर्णी,नाट्य निर्माते सदानंद बोरकर,माजी नगराध्यक्ष रत्नमाला भोयर,उपाध्यक्ष नंदकिशोर रणदिवे,तालुका समन्वय समिती अध्यक्ष प्रभाकर भोयर,धनश्री नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अजय गोगुलवार,माजी नगरसेवक प्रशांत समर्थ,महेंद्र करकाडे,वंदना वाकडे, प्रवीण मोहुर्ले,डॉ.किरण किशोर कापगते आदी उपस्थित होते. कलेची देवता नटराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन व दीपप्रज्वलनाने झाडीपट्टी सांस्कृतिक महामहोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.गायक संतोष कुमार, सुनील कुकुडकर आणि संचाने सादर केलेले झाडीपट्टी गीत व महाराष्ट्र गीत आणि युवराज गोंगले व ममता गोंगले संचाने सादर केलेल्या स्वागत गीतामुळे महोत्सवात रंगत आली. प्राचार्य सदानंद बोरकर यांनी प्रास्ताविक केले.चंद्रपूर,गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या झाडीपट्टीतील जिल्ह्यांत दीडशे वर्षांची परंपरा असलेली लोककला जोपासण्यासाठी विद्यापीठाने सांस्कृतिक केंद्राची स्थापना करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ.परशुराम खुणे यांनी कला महोत्सवाचे आयोजन करून शासनाने झाडीपट्टीतील लोककलाकारांचा सन्मान केला, याविषयी समाधान व्यक्त केले.कार्यक्रमादरम्यान झाडीपट्टीतील बहिणाबाई म्हणून परिचित असलेल्या कवयित्री अंजना खुणे, नाट्यनामते प्राचार्य सदानंद बोरकर, नाट्यकलावंत हिरालाल पेंटर आणि पद्मश्री डॉ.परशुराम खुणे यांचा शासनाचे वतीने जीवनगौरव पुरस्कार तर विविध नाट्यमंडळांच्या माध्यमातून परिसरात लोककला जोपासत असल्याबद्दल नाट्यकलावंत अरविंद झाडे, विजय मुळे,शेखर पटले,शबाना खान, मंजूषा जोशी, मुकेश गेडाम,भूमाला कुमरे, देवेंद्र दोडके,नारायण चुदरी, अब्दुलगनी शेख,शेखर डोंगरे आदी कलावंतांचा शाल,श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व अक्षय कुलकर्णी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.यावेळी ‘झाडीपर्व’ या विशेषांकाच्या मुखपृष्ठाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.संचालन गजानन कोर्टलवार यांनी तर अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व संमेलनाध्यक्ष डॉ.परशुराम खुणे यांचा परिचय मंजूषा जोशी यांनी करून दिला.सुखदेव चौथाले यांनी आभार मानले.कार्यक्रमाला चंद्रपूर, गडचिरोली,भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील लोककलावंत आणि निमंत्रित मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छत्रपती शिवरायांच्या जयजयकाराने पुलगाव नगरी दुमदुमली

पुलगाव । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज शोभायात्रा समितीने काढलेल्या शिवराय जन्मोत्सव मिरवणुकीत युवा, महिला,विद्यार्थी व पुलगावकर शिवभक्तांनी उत्स्फूर्त सहभागी होऊन शिवरायांच्या जयजयकाराने पुलगाव शहर दुमदुमून टाकले.

स्थानीय गांधीनगर मैदानातून सायंकाळी सहा वाजता शिवजन्मोत्सव मिरवणुकीला प्रारंभ झाला. अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज, मा जिजाऊ अग्रस्थानी होते. रोशनी व फटाक्याच्या आतिश बाजीने आसमंत दुमदुमून गेला होता. वर्धा येथील श्रीराम ढोल पथक यांच्या वाद्याच्या झंकाराने वातावरण भारावून गेले होते. लिनेस क्लब पुलगावचे महिला व आदर्श विद्यालय पुलगाव यांच्याविद्यार्थी लेझीम पथकाने शोभा यात्रेचा जोश वाढवला होता.लहान मुलामुलींचे लाठी काठी पथक सुंदर रचना सादर करीत होते.सिद्धेश्वर वारकरी हरिपाठ मंडळाच्या बाल वारकऱ्याची दिंडी भक्तिमय वातावरणाची निर्मिती करत होती. शिवाजींचा पाळणा, सरदारांसह शिवराय, शिवरायांची पालखी, शिव परिवार इत्यादि देखावे शोभयात्रेची शोभा वाढवीत होते. ठिकठिकाणी सडा,रांगोळ्या घालून पुष्पवृष्टी करून व औक्षवंण करून शिवरायांना वंदन करण्यात आले.या. भव्य शोभायात्रेचे सर्वत्र उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सव व भागवत कथा

पुलगाव–येथील हाऊसिंग बोर्ड कॉलनी स्थित श्री संत गजानन महाराज देवस्थानामध्ये श्री चा प्रगट दिन महोत्सव व संगीतमय भागवत कथा कार्यक्रमाचे आयोजन २६ फेब्रुवारी ते ३ मार्च या दरम्यान करण्यात आले आहे. हे महोत्सवाचे २९ वे वर्ष आहे.

महोत्सवाची सुरवात भागवत कथेने होईल.२६ फेब्रुवारी रोजी भागवत कथेला प्रारंभ होणार आहे. भागवताचार्य तीरथ दादा महाराज हे भागवत कथेचे वाचन करणार आहेत .सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ६ या वेळात भागवत कथा पार पडेल. रोज सकाळी काकड आरती, त्यानंतर भागवत कथा व सायंकाळी हरिपाठ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २५ फेब्रुवारी रोजी सकाळी गजानन महाराजांच्या मूर्तीचा अभिषेक करण्यात येईल .सोमवार २६ फेब्रुवारीला सकाळी ९ वाजता गणेश पूजन व तीर्थ कलश स्थापना झाल्यानंतर कथेला प्रारंभ होईल. रोज दुपारी भजनी मंडळांच्या वतीने येथे भजनांचे कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. रविवार ३ मार्च रोजी सकाळी गजानन महाराजांच्या मूर्तीचा अभिषेक मान्यवरांच्या हस्ते पार पडेल .सकाळी ९ ते १० या वेळात भागवत कथा व श्री चा प्रगट उत्सव होईल. दुपारी १२ वाजता महाआरती त्यानंतर भागवत कथेची सांगता. दुपारी ३ वाजता भागवत ग्रंथ व श्रीच्या पालखीची पुलगाव नगरीत मिरवणूक काढण्यात येणार आहे. सोमवार ४ मार्चला तिरथ दादा महाराज हे काल्याचे किर्तन करतील .दुपारी २ वाजता नंतर महाप्रसाद कार्यक्रमाला प्रारंभ होणार आहे .आयोजित सर्व धार्मिक कार्यक्रमांचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संत गजानन महाराज देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

मातृभाषेत बोलतो, तो अडाणी कसा?

देशात राष्ट्रवादाच्या नावाखाली लढणाऱ्या वर्गाला संस्कृत ही केवळ १४ हजार लोकांची मातृभाषा आहे, हे जाणून आश्चर्य वाटेल. डिजिटल युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपण अजूनही प्रयत्न केले नाहीत, तर कदाचित २२ अनुसूचित भाषाही त्यांचे अस्तित्व वाचवू शकणार नाहीत. आपल्या मातृभाषेत बोलायला इथले लोक टाळतात, हे भारताचे दुर्दैव आहे. जर कोणी मातृभाषेत बोलले तर त्याला अडाणी समजले जाते, त्याच्या कौशल्याचा अवमान केला जातो. इंग्रजी मानसिकतेने भाषेला सामाजिक स्थितीशी जोडले आहे. श्रीकृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींचा हा आपले बंद डोळे उघडणारा संकलित लेख.... संपादक.

आज २१ फेब्रुवारी रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा केला जातो. जगभरातील भाषा आणि सांस्कृतिक विविधता जोपासणे आणि त्याबाबत जागरूकता निर्माण करणे, हा या दिवसाचा उद्देश्य आहे. युनेस्कोने दि.१७ नोव्हेंबर १९९९ रोजी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली होती. जगात सुमारे ७ हजार भाषा बोलल्या जातात. भारतातही प्रामुख्याने २२ भाषा बोलल्या जातात. भारतात जवळपास १३००च्या आसपास मातृभाषा आहेत. आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाच्या दिवशी जगभरात अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. यानिमित्ताने शिक्षण आणि साहित्याशी निगडित लोक विविध भाषांबद्दल चर्चा करतात. मातृभाषेबद्दल जागरूकता निर्माण करणे, भाषिक विविधता जोपासणे, त्याचे महत्त्वदेखील अधोरेखित केले जाते. जगात काही मातृभाषा लोप पावत असल्याबद्दलही जागतिक पातळीवर चिंता व्यक्त केली जाते. मातृभाषेचे संवर्धन करणे, मातृभाषेचा प्रचार-प्रसार करण्याबाबत धोरण ठरवले जाते.

भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानची निर्मिती झाली. पाकिस्तानची निर्मिती झाली तेव्हा पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान असे दोन भाग होते. पूर्व बांगलादेशमध्ये उर्दू आणि पश्चिम बांगलादेशमध्ये बंगाली भाषिकांचे प्रमाण अधिक होते. तत्कालीन पाकिस्तान सरकारने भाषा धोरण लागू करून पाकिस्तानची अधिकृत भाषा म्हणून उर्दूला मान्यता दिली होती. पाकिस्तान सरकारच्या या धोरणाच्या विरोधात ढाका विद्यापीठात विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. ढाका विद्यापीठातील आंदोलनावर पोलिसांनी २१ फेब्रुवारी १९५२ रोजी गोळीबार केला होता. आंदोलनाच्या परिणामी पाकिस्तान सरकारला नमतं घ्यावं लागले आणि बंगाली भाषेलाही मान्यता द्यावी लागली होती.

भाषिक आणि सांस्कृतिक विविधता आणि बहुभाषिकतेबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी युनेस्कोने सन २०००पासून दरवर्षी २१ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन साजरा करण्यास सुरुवात केली. हा दिवस साजरा करण्याची कल्पना कॅनडामध्ये राहणारे बांगलादेशी रफीकुल इस्लाम यांनी दिली. बंगाली भाषेचे अस्तित्व टिकवून ठेवणे यासाठीही हा दिवस स्मरणात ठेवला जातो. सन १९५२मध्ये ढाका विद्यापीठातील विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या मातृभाषेचे अस्तित्व टिकवण्यासाठी २१ फेब्रुवारी रोजी आंदोलन केले होते. यात मृत्युमुखी पडलेल्या तरुणांच्या स्मरणार्थ युनेस्कोने मातृभाषा दिनासाठी हा दिवस निवडला. वर्ष २०२२साठी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाची थीम बहुभाषिक शिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा वापर: आव्हाने आणि संधी ही होती. २०२२-२०३२ हे दशक संयुक्त राष्ट्रांकडून देशी भाषांचे आंतरराष्ट्रीय दशक म्हणून साजरे केले जाईल.

लहानपणी ज्या भाषेशी आपला परिचय होतो, ज्या भाषेच्या सानिध्यात आपण राहतो, वाढतो, त्या भाषेला मातृभाषा म्हणतात. युनायटेड नेशन्स-युएनच्या अहवालानुसार जगभरात बोलल्या जाणाऱ्या ६००० भाषांपैकी जवळपास २६८० भाषा- ४३ टक्के लुप्त होत आहेत. लुप्त होण्याचे प्रमाण खूप जास्त आणि वेगवान आहे. प्रत्येक महिन्याला सरासरी दोन भाषा नाहीशा होत आहेत. त्यामुळे प्रादेशिक सांस्कृतिक आणि बौद्धिक वारसा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. डिजिटल क्रांतीत मागे पडलेल्या छोट्या भाषा त्यांचे अस्तित्व वाचवू शकलेल्या नाहीत. डिजिटल प्लॅटफॉर्मवर शंभरहून कमी भाषा वापरल्या जातात.

जागतिक स्तरावर, लहान देशांच्या मातृभाषा वेगवेगळ्या प्रदेशात प्रचलित आहेत. जागतिक डेटा माहितीनुसार, भारताची अधिकृत भाषा असण्यासोबतच, सात देशांमध्ये मातृभाषा म्हणून हिंदीला प्रमुख स्थान आहे. यामध्ये फिजी, न्यूझीलंड, जमैका, सिंगापूर, त्रिनिदाद टोबॅगो, मॉरिशस इ.देशातही या भाषा आहेत. पापुआ न्यू गिनी सारखे क्षेत्र उच्च भाषिक विविधतेची उदाहरणे आहेत. ३.९ दशलक्ष लोकसंख्येद्वारे येथे बोलल्या जाणार्या भाषांची संख्या सुमारे ८३२ आहे. या भाषा ४० ते ५० भिन्न भाषा कुटुंबातील आहेत. जगातील सुमारे ६० टक्के लोक फक्त ३० प्रमुख भाषा बोलतात.

भारतासारख्या विशाल बहुभाषिक देशात १९,५६९ भाषा किंवा बोली मातृभाषा म्हणून बोलल्या जातात. १२१ कोटी लोकसंख्येच्या भारतात १२१ भाषा अशा आहेत, ज्या १०,००० किंवा त्याहून अधिक लोक बोलतात. संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेल्या २२ भाषा या भारतातील ९३.७१ टक्के लोकांच्या मातृभाषा आहेत. भारतातील ९० टक्के भाषा बोलणाऱ्यांची संख्या एक लाखापेक्षा कमी आहे. १३६५ मातृभाषांपैकी बहुतेक प्रादेशिक भाषा आहेत. भारत हा प्राचीन काळापासून बहुभाषिक देश आहे, पण ही संस्कृतीही आता धोक्यात आली आहे. भारतातील ४३ कोटी हिंदी भाषकांपैकी केवळ १२ टक्के लोक द्विभाषिक आहेत, तर ९७ दशलक्ष लोकांपैकी १८ टक्के लोक बंगाली आहेत. देशात राष्ट्रवादाच्या नावाखाली लढणाऱ्या वर्गाला संस्कृत ही केवळ १४ हजार लोकांची मातृभाषा आहे, हे जाणून आश्चर्य वाटेल. डिजिटल युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपण अजूनही प्रयत्न केले नाहीत, तर कदाचित २२ अनुसूचित भाषाही त्यांचे अस्तित्व वाचवू शकणार नाहीत. आपल्या मातृभाषेत बोलायला इथले लोक टाळतात, हे भारताचे दुर्दैव आहे. जर कोणी मातृभाषेत बोलले तर त्याला अडाणी समजले जाते, त्याच्या कौशल्याचा अवमान केला जातो. इंग्रजी मानसिकतेने भाषेला सामाजिक स्थितीशी जोडले आहे. जर आपण आपल्या मातृभाषेचे संवर्धन केले नाही तर भाषिक विविधता आपसूकच नाहीशी होईल.

भारतासारख्या देशात मातृभाषा आणि कोट्यवधी विद्यार्थ्यांची अभ्यासाची भाषा एक नसल्यामुळे शिक्षण घेणे अनेकदा आव्हानात्मक होते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि शाश्वत विकास उद्दिष्टे या दोन्हींचे उद्दिष्ट सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण आणि आजीवन शिक्षण उपलब्ध करून देणे हे आहे. मातृभाषेवर आधारित बहुभाषिक शिक्षणातूनच दर्जेदार शिक्षण आणि एसडीजीएस मिळू शकतात. यासाठी मुलाचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून होणे गरजेचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ही तरतूद करण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षणाबरोबरच न्यायालयीन कामकाज आणि संबंधित निर्णयांमध्येही स्थानिक भाषा वापरण्याची गरज आहे. उच्च आणि तांत्रिक शिक्षणात स्थानिक भाषांचा वापर हळूहळू वाढवणे हे देखील या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. जानेवारी २०२२मध्ये मध्य प्रदेश सरकारने राज्यात वैद्यकीय, अभियांत्रिकी शिक्षण हिंदी माध्यमातून घेण्याचा निर्णयही घेतला आहे. यासोबतच प्रत्येकाने आपल्या घरात मातृभाषेच्या वापराचा अभिमान बाळगून प्राधान्य दिले पाहिजे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये मातृभाषेतून शिक्षण सुरू आहे. बहुभाषिक समाजासाठी सरकारने नॅशनल ट्रान्सलेशन मिशन, भारतवाणी प्रकल्प अशा योजनाही बनवल्या आहेत.

!! आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस चिरायू होवो !!

संकलन व शब्दांकन –
श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.
श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ,
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.

जगद्गुरु नरेंद्रचार्य महाराज सेवा समितीतर्फे रक्तदान शिबिर संपन्न

चिमूर । प्रतिनिधी

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्र चार्य जी महाराज यांच्या प्रेरणेने स्वस्वरूप संप्रदायातर्फे दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. त्या अनुषंगाने आपल्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये दहा ते पंचवीस फेब्रुवारी या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. आपल्या महाराष्ट्रात सिकलसेल, अनेमिया, हिमोफिलिया, ब्लड कॅन्सर, किडनी फेलूअर इत्यादी बिमारीचे पेशंट हे बऱ्याच प्रमाणात आढळत असून अपघाताचे प्रमाणही बऱ्याच प्रमाणात वाढलेले आहे.

त्या अनुषंगाने चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथे दिनांक १८ फेब्रुवारी २०२४ रोज रविवारला रक्तदान शिबिराचे आयोजन प्राथमिक आरोग्य केंद्र शंकरपूर येथे करण्यात आले. या रक्तदान शिबिराला नागरिक व स्वस्वरूप संप्रदायाची चिमूर तालुक्यातील भाविक भक्तांनी भरभरून प्रतिसाद दिला. सदर शिबिरात ११५ रक्तदात्यांनी आपले अमूल्य रक्तदान केले या शिबिराला शासकीय ब्लड बँक लाईफ लाईन नागपूर ही संस्था रक्त संकलन करण्यासाठी उपलब्ध होती. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश समन्वयक चिमूर विधानसभा क्षेत्र डॉ. सतीश वारजूकर तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष पंचायत समिती सदस्य रोशन हे होते. स्वस्वरूप संप्रदाय चिमूर तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर माडवे व सर्व तालुका कमिटी जिल्हा संजीवनी प्रमुख अध्यक्ष सोनटक्के, जिल्हा लेफ्टनंट कर्नल सुरेश भिवणकर, युवा कार्यकर्ते प्रणय माडगे, हर्षल चित्रित, विशाल गहूकर व अन्य भक्त उपस्थित होते. शिबिराचे शेवटी प्राथमिक स्वास्थ्य केंद्राचे अधिकारी डॉक्टर सुबोध वाकडे यांनी शिबिराला भेट दिली. व स्वस्वरूप संप्रदायाचे भरभरून कौतुक केले. लाईफ लाईन ब्लड बँक नागपूर यांनी संस्थानाला प्रशस्तीपत्र देऊन या शिबिराची सांगता केली.

ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात शिवजयंती

छत्रपती शिवाजी महाराजांनी सुराज्य आणि स्वराज्य निर्माण केले– विवेक बोढे

घुग्घुस । प्रतिनिधी

येथील ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात सोमवार, १९ फेब्रुवारी रोजी भाजपा माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात शिवजयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले.मनोगत व्यक्त करतांना भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी जनतेसाठी सुराज्य आणि स्वराज्य निर्माण केले. शिवाजी महाराजांनी स्वराज्यविस्तार केला त्यांनी आदिलशाही, मुघलशाही, कुतुबशाही अशा सत्तांवर आक्रमणे केली. यातूनच हिंदवी स्वराज्य उभे राहिले. शिवजयंतीनिमित्त मी छत्रपती शिवजी महाराजांना अभिवादन करतो.यावेळी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, माजी पं. स. उपसभापती निरीक्षण तांड्रा, प्रयास सखी मंच अध्यक्षा किरण बोढे, पुजा दुर्गम, अमोल थेरे, गणेश कुटेमाटे, वसंत भोंगळे, श्रीकांत सावे, तुलसीदास ढवस, धनराज पारखी, अतुल चोखांद्रे, स्वप्नील इंगोले, कोमल ठाकरे, पियुष भोंगळे, मारोती मांढरे, शौर्य बोढे, सुनंदा लिहीतकर, शीतल कामतवार, खुशबू मेश्राम, नेहा कुम्मरवार, स्वाती गंगाधरे आदी उपस्थित होते.

ओबीसींच्या आरक्षणाला कुठलाही धक्का लागू दिला नाही;राज्य सरकारचे अभिनंदन–डॉ.अशोक जीवतोडे

चंद्रपूर । प्रतिनिधी

राज्यातील मराठा समाजाला शिक्षण आणि नोकरीत १०% आरक्षण देणारे विधेयक आज दोन्ही सभागृहात महाराष्ट्र विधिमंडळात एकमताने मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सर्वस्वी देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात महायुती राज्य सरकार सातत्याने सर्व समाज घटकांसाठी कार्यरत आहे. आज सामाजिक न्याय दिन आहे. त्या निमित्ताने ओबीसी आरक्षणाला धक्का लागू न देता, राज्य सरकारने मराठा समाजाला आरक्षण दिले. राज्य सरकारच्या या भूमिकेचे विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांनी अभिनंदन केले.

राज्य सरकारच्या भूमिकेचं ओबीसी समाजाच्या विविध संघटनेतर्फे अभिनंदन करण्यात येत आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी देखील अभिनंदन केले आहे.राज्य सरकारने हा निर्णय घेतला,ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता ,राजकीय आरक्षण न देता मराठयांना आरक्षण दिले हा सुद्धा निर्णय स्वागतार्ह आहे. ओबीसी समाजाचे नुकसान झाले नाही. ओबीसी समाजाचा विजय झाला.एकमताने हे विधेयक मंजूर करण्यात आले. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावल्यामुळे सभागृहातील सर्व सदस्यांचे, विरोधी पक्षनेते आणि सर्व गटनेत्यांचे आभार मी मानतो आहे. राज्यातील ओबीसी समाजाच्या पाठीशी राज्य सरकार खंबीरपणे उभे आहे, याचा मला व ओबीसी समाजाला आनंदच झाला आहे, असे डॉ. अशोक जीवतोडे म्हणाले.

जिद्द,चिकाटी आणि संघर्ष हाच लोक विद्यालय शाळेचा गुणवत्ता पॅटर्न

१० विद्यार्थी एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण

तळोधी (बा) । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित राष्ट्रीय दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेचा (एनएमएमएस) अंतिम निकाल घोषित झाला असून त्यात लोकविद्यालय तळोधी(बा)येथील विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व यश संपादन केले आहे.शाळेतील १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे.विशेष म्हणजे पदविधर शिक्षक संतोष नन्नावार यांच्या संकल्पेतून लोकसहभागातून तयार केलेल्या ग्रंथालयातील पुस्तकांचा वापर करत या वर्षी प्राप्त केलेल्या चमकदार कामगिरीमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.नुकत्याच झालेल्या शासकीय रेखाकला इंटरमिजीएट -एलिमेंटरी परिक्षेत देखील शाळेचा निकाल १००% लागलेला आहे.

एनएमएमएस परिक्षेत जोगिंदर सिंग जुनी ,संजना मानापुरे ,सांजल मोहूर्ले,दक्ष येंचलवार,ओमश्री खडसिंगे,मोहनिश रामटेके,हितेश बावनथडे ,माही साखरे , शारदा रामटेके,अद्विता गेडाम या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ यश प्राप्त केले आहे.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ठ यशाबद्दल दी रूरल एज्युकेशन सोसायटी ब्रम्हपुरी (सन१९६०) द्वारा संचालित लोक विद्यालय तळोधी(बा)चे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व्ही.एस.तोंडरे , संस्थेचया व्यवस्थापन समितीचे सचिव आर.एस.राऊत,व्ही.एस.बगमारे, ए.आर.नागमोती,ए.एम.राऊत,डी.पी. समर्थ सदस्य दि रूरल एज्युकेशन सोसायटी,नागभीड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी संजय पालवे मुख्याध्यापक ए.वाय. बांगरे,शाळा व्य.स.अध्यक्ष केशव जांभुळे,सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

विद्यार्थ्यांना रवींद्र निनावे, संतोष नन्नावार, सोनल उंबरकर, अजय सगळाम ,निखिल म्हस्के, शिशिर कोरेकर,ज्योती निकोडे, यांचे मार्गदर्शन लाभले आहे. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ठ यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा साजरा

जिंतूर । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे प्रमाणे याहीवर्षी जिंतूर शहरात बहुजन प्रतिपालक,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३९४ व्या जयंती निमित्त सार्वजनिक शिवजयंती समितीच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करुन जयंती साजरी करण्यात आली.

शिवजन्मोत्सवा निमित्त शहरातील मुख्य मार्गावर भगवे ध्वज लावण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळ्याचा नियोजित जागेवर सकाळी ९ वाजता जिजाऊ ब्रिगेडचा वतीने प्रतिमा पूजन करुण ध्वजारोहन करण्यात आले.यानंतर आन्नाभाऊ साठे चौकातुन तहसीलदार राजेश सरोदे,पोलीस निरीक्षक बुद्धिराज सुकाळे,न प चे मुख्यालय सहाय्यक नायब तहसीलदार प्रशांत राखे यांच्या हस्ते पूजन करुण भव्य दिव्य मिरवणुकीस सुरुवात करण्यात आले.या मिरवणुकीत अश्वारूढ़ बाळशिवाजीराजे,माँ साहेब जिजाऊ,छत्रपती संभाजी महाराज यांचा वेशभुसेतील विद्यार्थी हे सर्वांचे लक्ष वेधुन घेत होते.या मिरवणुकीत तालुक्यातील विविध शाळेचा विद्यार्थी विद्यार्थिनीनी लेझीमचे विविध प्रकारचे सादरीकरण केले शिवाय हलगी पथकाने मिरवणुकीत शोभा वाढवली होती या मिरवणुकीत मोठ्या संखेने महिला,तरुणी भगवे फेटे बांधून सामिल झालेल्या असल्यामुळे वातावरण भगव्यमय झाले होते.शिवजन्मोत्सवा निमित १७ फेब्रुवारी पासून शहरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये १७ रोजी सायंकाळी ३९४ महिलांची मशाल फेरी काढण्यात आली यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात रात्री ९ वाजता ३९४ तोफांची मानवंदना देण्यात आली.मिरवणूक शहरातील मुख्य रस्त्यावरुन निघुन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरार समारोप करण्यात आला.ही मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्याचा दुतर्फा नागरिकांनी मोठी गर्दी केली होती मिरवणूक यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक शिवजयंती मोहत्सव समितीचया पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले.छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शहरातील राजकीय नेते पदाधिकारी यांनी मिरवणुकीत सहभागी होऊन अभिवादन केले यामध्ये प्रेक्षा भांबळे,प्रतापराव देशमुख,केशवराव बुधवंत,मनीषा केंद्रे,आशाताई खिल्लारे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते

कमल स्पोर्टीग क्लबचा शिवजयंती महोत्सव जल्लोषात साजरा

ग्रँडमास्टर शिफुजी शौर्य यांनी जिंकली हजारो युवकांची मने

छत्रपती शिवाजी महाराज प्रत्यक्ष जगण्याचा प्रयत्न युवकांनी करावा–रविंद्र पाटील

चंद्रपूर । प्रतिनिधी

ग्रँडमास्टर शिफुजी भारद्वाज आले, हजारो युवकांना बघीतले आणि जिंकले.कमल स्पोर्टींग क्लब, चंद्रपूरच्या वतीने दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी स्थानिक छत्रपती शिवाजी चौक येथे आयोजित शिवजयंती महोत्सवास हजारोच्या संख्येने उपस्थित असलेल्या युवक युवतींनी व आबालवृध्दांनी उभे राहून शिफुजी शौर्य यांचे जल्लोषपूर्ण वातावरणात व फटाक्यांच्या आतिषबाजीत स्वागत केले.

या शिवजयंती महोत्सवाला छत्रपती शिवराय, गोळवलकर गुरूजी व भारत मातेच्या प्रतिमेस अतिथींनी दीपप्रज्वलन, माल्यार्पण व शिवआरती करून सुरूवात करण्यात आली. या शिव जयंती महोत्सव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर होते. व्यासपीठावर ग्रँडमास्टर शिफुजी शौर्य भारद्वाज, व्याख्याते रविंद्र पाटील, खुशाल बोंडे, माजी महापौर अंजलीताई घोटेकर, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, कमल स्पोटींग क्लबचे जिल्हाध्यक्ष रघूवीर अहीर, समाजसेवी दामोदर मंत्री, विनोद शेरकी, श्यामल अहीर, प्रदिप किरमे, श्रीनिवास सुंचूवार, कमल कजलीवाले, राजवीर चौधरी, हर्षवर्धन अहीर आदी मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी बोलतांना हंसराज अहीर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या शेकडो जयंती, पुण्यतिथी साजरी झाली आहे. या चौकाच्या नामकरणास मान्यता मिळवित या चौकाला आज सुंदर, मनमोहक व म्युरलद्वारा महाराजांच्या शौर्याची गाथा कोरून या चौकाचे सौंदर्य वाढविले आहे. महाराजांचे जीवन व त्यांनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेला पराक्रम आजच्या युवकांनी स्वतः मध्ये बानवून विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करून देशाची सेवा करावी असे आवाहन केले. अहीर यांनी शिफूजी शौर्य यांच्या धाडसाचे कौतूक करून त्यांच्या राष्ट्र सेवेबद्दलही गौरवोद्गार काढले.याप्रसंगी शिफुजी शौर्य भारद्वाज यांनी उपस्थित हजारो युवकांशी संवाद साधत देशासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. जगातील ७३ देशांमध्ये शिवछत्रपतींचा गौरव केला जातो असे सांगत छत्रपती शिवरायांच्या शौर्याच्या इतिहासातून बोधहित युवकांनी संयम, चारित्र्य, परिश्रम व राष्ट्रहितासाठी लढा देण्याचा संकल्प करून स्वतःला देशाकरीता समर्पित करण्यास सज्ज व्हावे असे आवाहन केले. व्याख्याते रविंद्र पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून महाराजांनी आपल्या राज्यात गद्दार व फितुरांना कधीच थारा दिला नाही.महिलांप्रति त्यांचे विचार महान होते. ते प्रत्येक स्त्रीयांमध्ये माता व भगीनींचे रूप बघायचे अनेक गद्दारांना कठोर शिक्षा देवून त्यांच्या अपराधांचा हिशेब केला. त्यामुळे शिवाजी महाराजांचे चरित्र वाचून किंवा समजून घेण्याने महाराजांची महती कळणार नाही तर त्यांचे विचार जगण्याची, स्वतामध् ये उतरविण्याची गरज पाटील यांनी प्रतिपादीत केली.त्यांनी याप्रसंगी महाराजांच्या अनेक पैलूंना स्पर्श करीत महाराजांची महती सांगीतली. बाजी प्रभु देशपांडे म्हणाले होते की, लाख मेले तरी चालतील परंतू लाखाचा पोशिंदा जगला पाहीजे. राजामुळे अस्तित्व व किंमत आहे हे साऱ्या जगाने व महापुरूषांनी ओळखले मात्र हे चिरंतन सत्य आम्हांस कधी कळेल अशी विचारणा त्यांनी आपल्या संबोधनातून केली.आपल्या प्रास्ताविकात कमल स्पोर्टींग क्लबचे जिल्हाध्यक्ष रघुवीर अहीर म्हणाले की, मा. प्रधानमंत्री मोदीजी यांनी आत्मनिर्भर भारत साकार करण्यासाठी छत्रपती शिवरायांची प्रेरणा आवश्यक आहे. आजचा हा शिवजयंती महोत्सव याच उद्दात भावनेतून साजरा होतो आहे. युवकांनी महाराजांचा आदर्श दृष्टीपूढे ठेवून आत्मनिर्भर भारताच्या उभारणीसाठी योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सुरेख संचालन प्रा. श्याम हेडाऊ यांनी केले.यावेळी चंद्रपूर ते अयोध्या असा सायकलने प्रवास करणाऱ्या धनोटी (पोंभुर्णा) निवासी मयुर महादेवराव देऊरमले या युवकाचा ग्रँडमास्टर शिफुजी व मान्यवरांनी शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार केला. खुशाल बोंडे यांनी समारोपीय भाषणातून हंसराज अहीर यांच्या पुढाकारातूनच चंद्रपूरात शिवजयंती उत्सवाला सर्वप्रथम सुरूवात झाल्याचे सांगितले.या शिवजयंती महोत्सवाला हजारोच्या संख्येत युवक, युवती व विविध क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राहुल गायकवाड, राजेश वाकोडे, जगदीश दंडेले, प्रणय डंबारे, मयुर भोकरे, विशाल गिरी, स्वप्नील मुन, आशय चंदनखेडे, प्रविण चुनारकर, विक्की लाडसे, सुभाष आदमने, प्रज्वल गिलबीले व अन्य सदस्यांनी परिश्रम घेतले.

आमदार किशोर जोरगेवार यांनी वाहिली छत्रपती शिवाजी महाराज यांना आदरांजली

चंद्रपूर । प्रतिनिधी

शिव जयंती निमित्त आमदार किशोर जोरगेवार यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील शिव स्मारकाला माल्यार्पण करुन छत्रपती शिवाजी महाराज यांना आदरांजली अर्पण केली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी असा जयघोष करण्यात आला. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, युवा नेते अमोल शेंडे, सायली येरणे, शहर संघटक विश्वजित शाहा, आदिवासी विभागाचे जिल्हा अध्यक्ष जितेश कुळमेथे, प्रा. श्याम हेडाऊ, राम जंगम,विनोद अनतंवार नितेश गवळी, राहुल मोहुर्ले, राशिद हुसेन, जय मिश्रा, आशा देशमूख, कविता निखाडे, सोनाली आंबेकर, माधूरी निवलकर, अनिता झाडे, अस्मिता डोणारकर, चंद्रशेखर देशमुख, गोपी मित्रा, किशोर बोलमवार, अभिजीत पोटे, संजय निकोडे, राजु व्यंकटवार आदींची उपस्थिती होती.

जेतवन बुद्ध विहारात शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

चिमूर । प्रतिनिधी

तालुक्यातील जेतवन बुद्ध विहार, मालेवाडा येथे दि.१९ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम संपन्न झाला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सत्यफुलाबाई चव्हाण व शारदाबाई गजभिये यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करून अभिवादन केले. याप्रसंगी योगेश मेश्राम यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.१६ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव 'जाणते राजे' होते की त्यांच्या राज्यातील प्रजा सुखी होती, आनंदी होती. शेती हे केवळ उपजीविकेचे साधन नसून, रयतेच्या उत्पन्नाचे स्रोत आहे. शेती पिकली तर रयत सुखी, रयत सुखी तर राजा सुखी' हे सूत्र महाराजांना समजले होते. त्यामुळे महाराजांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन रयतेला मजबुती देणारा होता. म्हणूनच शिवाजी महाराज 'शेतकरी हितकर्ते राजे' होते. छत्रपती शिवाजी महाराजांमध्ये शौर्य, धैर्य, सकारात्मकता, मुत्सद्देगिरी, युद्धनीती, दूरदृष्टी, व्यावहारिकता आणि चातुर्य असे अनेक गुण होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात सर्व धर्माचे, पंथांचे, जातीचे मावळे होते. जातीधर्माच्या मर्यादा ओलांडून स्वराज्यात सर्वांना शिवाजी महाराजांनी सामावून घेतले. त्यांचे विचार प्रत्येकाने आत्मसात करावे, अशा शब्दात मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचं स्मरण करून त्यांना अभिवादन केलं. याप्रसंगी पोलीस पाटील हेमंत गजभिये, आशिक रामटेके, विलास मेश्राम, नीलकंठ बांबोडे, प्रेमजीत चव्हाण, सूरज गजभिये, धम्मादीप गजभिये, शकुंतलाबाई मेश्राम, शोभाबाई चव्हाण, तृप्ती ठवरे, मिलन मेश्राम आदी मान्यवर व गावातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश मेश्राम यांनी केले. व आभार प्रदर्शन प्रदीप मेश्राम यांनी मानले.

२८ फेब्रुवारी रोजी आयटी आय मधील निरुपयोगी साहित्यांचा लिलाव

चंद्रपूर–शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागभिड येथील विविध व्यवसायातील निरुपयोगी, कालबाह्य झालेली निर्लेखित संयत्रे, साहित्य, उपकरणे आहे त्याच अवस्थेत विक्री करावयाचे आहे. याकरीता दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १ वाजता लिलाव आयोजित करण्यात आला आहे. ईच्छुक निर्लेखित साहित्य खरेदीदारांनी लिलावात सहभागी होण्यासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, एम.आय.डी.सी. परीसर, नागभिड येथे अधिकृत लेख्यासह उपस्थित राहावे. असे नागभिड, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य आर.एम. डांगे यांनी कळविले आहे.

शंकरपूर येथे शिवजयंती उत्सव थाटात

चिमूर । प्रतिनिधी

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथे दिनांक १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मोठ्या थाटात संपन्न झाला. यावेळी शंकरपूर ग्रामपंचायतीचे सरपंच तथा काँग्रेसचे युवा नेते साईस वारजूकर यांनी ग्रामपंचायत चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले.

या कार्यक्रमाला शंकरपूर येथील हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमा प्रित्यर्थ गावातील मुख्य रस्त्याने छत्रपती शिवाजी महाराजांचे उत्सवा निमित्त भव्य मीरावणुकीचे आयोजन करण्यात आले होते. मीरावणुकीमध्ये विविध प्रकारच्या झाकी ने नागरिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाला बहुसंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

तसेच शिवाजी चौक भिशी रोड शंकरपूर येथे भाजपाचे चिमूर क्षेत्राचे आमदार बंटीभाऊ भांगडिया यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून महाराजांना अभिवादन केले. तत्पूर्वी शंकरपूर येथील भाजपा कार्यकर्त्यांनी सुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांच्या मीरवणुकीचे आयोजन करून मुख्य मार्गाने प्रदर्शन दाखिले. या कार्यक्रमाला अनिल शेंडे, नारायण चौधरी, वर्षा शेंडे तसेच इतर मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते शिवाजी चौकात कार्यक्रमाची सांगता महाप्रसाधने करण्यात आली.

राज्यस्तरीय पुरोगामी साहित्य संमेलनाची तयारी अंतिम टप्प्यात



चंद्रपूर । प्रतिनिधी

दिनांक–२४ फेब्रुवारी–२०२४ रोजी होऊ घातलेल्या पहिल्या राज्यस्तरीय पुरोगामी साहित्य संमेलनाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.कार्यक्रम परिसराला महाकवी वामनदादा कर्डक साहित्य नगरीं,असे नाव देण्यात आले असून,सभागृहाच्या दालनाला शहिद नरेंद्र दाभोडकर तर विचार मंचाला जेष्ठ पत्रकार शहिद गौरी लंकेश यांचे नाव देण्यात येणार आहे.औद्योगिक नगरीं म्हणून ओळख असलेल्या बाल्लूलारपूर शहरातील राजे बल्लाळशाह नाट्य गृहात हे पहिले राज्यस्तरीय पुरोगामी साहित्य संमेलन संपन्न होणार आहे.

सकाळी ९:०० वाजता कार्यक्रमाचे उदघाटन प्रख्यात विचारवंत प्रा.शाम मानव यांच्या हस्ते होणार असून,संमेलनाध्यक्ष म्हणून प्रसिद्ध साहित्यिक शिवा इंगोले (मुंबई),हे या संमेलनाला लाभले आहेत.विशेष अतिथी– निता चापले (राष्ट्रीय माजी महिला क्रिकेटर,लेखिका,तथा समाजिक कार्यकर्ता)मुंबई. प्रमुख उपस्थिती–विजय सूर्यवंशी रायगड. (संस्थापक अध्यक्ष,पुरोगामी पत्रकार संघ,भारत),बाळासाहेब आटांगळे,मुंबई. (राष्ट्रीय कार्याध्यक्ष,पुरोगामी पत्रकार संघ) संतोष जाधव,नाशिक(राज्य अध्यक्ष,पुरोगामी पत्रकार संघ,भारत) निलेश ठाकरे(राज्य सचिव,(पुरोगामी पत्रकार संघ,भारत) तर स्वागताध्यक्ष म्हणून प्रसिद्ध साहित्यिक प्रब्रम्हानंद मडावी हे भूमिका बजावणार आहेत. दुपारी :१२:०० वाजता प्रा.इसदास भडके.यांच्या अध्यक्षतेत निमंत्रितांचे कवी संमेलनाचे आयोजन केले आहे.या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी,गीतकार खेमराज भोयर करतील.या कवी संमेलनात राज्यातील प्रसिद्ध कवी सहभाग घेणार आहेत. दुपारी २:०० वाजता प्रसिद्ध वक्ता,पुरोगामी विचारवंत प्रा.जावेद पाशा,नागपूर यांचे 'शिवकालीन मुस्लिम मावळ्यांची भूमिका आणी बादशाह बहादूरशाह जफर यांच्या पर्यंतचा प्रवास' या विषयावर वाख्यान असेल. दुपारी ३:०० वाजता विलास थोरात,अमरावती यांचा हल्ला बोल हा एकपात्री प्रयोग सादर करण्यात येणार आहे. सायंकाळी –४:०० वाजता विवेक मोरे,अध्यक्ष उठाव साहित्य मंच मुंबई यांच्या अध्यक्षेते खाली विद्रोही कवी संमेलन होणार आहे.या कवी संमेलनाचे सूत्र संचालन–प्रसिध्द आंबेडकरी कवी बबन सरवदे,मुबंई करतील. संयकाळी–५३०:वाजता माजी राष्ट्रीय महिला क्रिकेटर,लेखिका,समाजिक कार्यकर्त्या तथा मार्गदर्शक निता चापले,मुंबई यांची प्रगट मुलाखत. सायंकाळी ६:३० वाजता संजय घरडे,अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली गजल संमेलन आयोजित केले आहे.या गजल संमेलनाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध गजलकार जगदीश भगत,वर्धा हे करतील.सायंकाळी ७:३० वाजता पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न होईल.कवयित्री संगीता घोडेस्वार यांचा समतेचा एल्गार (कविता संग्रह) तर प्रसिद्ध साहित्यिक रंगशाम मोडक यांचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणी आदिवासी समाज या शोध ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येईल. सायंकाळी ८:०० वाजता राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारोह संम्पन्न होणार असून पवन भगत(चंद्रपूर) यांच्या मराठी कादंबरी 'ते पन्नास दिवस' साठी अण्णाभाऊ साठे राज्य स्तरीय साहित्य गौरव पुरस्कार–२०२४,माजी राष्ट्रीय महिला क्रिकेटर निता चापले (मुंबई) यांना राजमाता जिजाऊ राज्य स्तरीय गौरव पुरस्कार–२०२४, रतनकुमार साळवे(संभाजी नगर) यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय पत्रकारिता गौरव पुरस्कार–२०२४,विजय भसारकर (वरोरा) यांना क्रांतिज्योती सावित्री फुले राज्यस्तरीय शिक्षक गौरव पुरस्कार २०२४, मा.रजिया हेमंत मानकर(बल्लारपूर)यांना फातिमा शेख राज्यस्तरीय शिक्षण गौरव पुरस्कार–२०२४,शहिद भगत सिंग राज्यस्तरीय युवा साहित्य गौरव पुरस्कार–२०२४.श्रुंखलं खेमराज भोयर(नागपूर)यांच्या पहिल्या इंग्रजी काव्य संग्रहासाठी तर राज्यस्तरीय युवा कला गौरव पुरस्कार–२०२४. स्नेहल शिरसाट (वरोरा) हिला प्रदान करण्यात येणार आहे.रात्री ९:०० वाजता संमेलन अध्यक्ष्यांचे अध्यक्षीय भाषण होईल रात्री–९:३० वाजता विद्रोही जलसा या कार्यक्रमाने या साहित्य संमेलनाचा समारोप करण्यात येईल.संमेलनाची तयारी अंतिम टप्प्यात असून,हे पहिले पुरोगामी साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी कार्यकर्ते कामाला लागले आहेत.जास्तीत जास्त साहित्य रसिक प्रेमींनी या साहित्य संमेलनाला हजेरी लावून हे संमेलन यशस्वी करावे,असे आवाहन पुरोगामी साहित्य संसदेचे महाराष्ट्र अध्यक्ष नरेंद्र सोनारकर,विदर्भ अध्यक्षा एड.योगिता रायपूरे, आदींनी केले आहे.

निवडणूक आयोग ५ वर्षे काय करतो?–राज ठाकरे

शिक्षकांना कामाला जुंपण्यावरून थेट सवाल

मुंबई–शारदाश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक आणि शिक्षक यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली. शिक्षकांना निवडणुकीच्या कामाला लावू नका, अशी मागणी या पालक आणि शिक्षकांनी राज ठाकरे यांच्याकडे केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता या पालकांनी व्यक्त केली होती. यावर राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला प्रश्न विचारला आहे. या शिक्षकांना निवडणुकीच्या कामात घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी कोणाची? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. असे असेल तर निवडणूक आयोग पाच वर्ष काय करते? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

निवडणूक आयोगाकडे पाच वर्ष काय काम असते? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. निवडणुका तोंडावर आल्या की घाईघाईने शिक्षकांना कामाला लावायचे, असे का केले जाते? असा प्रश्नही राज ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. पहिली ते चौथीच्या शिक्षकांना निवडणुकीच्या कामाला बोलावण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी घेतलेली भूमिका महत्त्वाची मानली जात आहे. कोणत्याही शिक्षकाने निवडणुकीच्या कामावर रुजू होऊ नये, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले आहे. त्यामुळे अशा शिक्षकांवर कोण शिस्तभंगाची कारवाई करतो, ते आम्ही पाहणार असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. या संदर्भात आम्ही निवडणूक आयोगाकडे भेटण्यासाठी जाणार आहोत. ते पाच वर्ष काय काम करतात? असा प्रश्न आम्ही त्यांना विचारणार असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. ही काही देशातील पहिली निवडणूक नाही, त्यामुळे सर्व नियोजन का केले जात नाही? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यासाठी निवडणूक आयोगावरच कडक कारवाई करायला हवी, असेही राज ठाकरे यांनी म्हटले आहे. लवकरच आमचे नेते निवडणूक आयोगाशी चर्चा करणार असल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले.मराठा आरक्षणावर होणाऱ्या विशेष अधिवेशनाचा काहीही परिणाम होणार नाही. हे सर्व दिखावा केला जात आहे. हा विषय राज्याचा नाहिच. यामध्ये तांत्रिक अडचणी आहेत. त्याबाबत केंद्रामध्येच तोडगा निघु शकतो, त्यामुळे हे सर्व मराठा समाजाला झुरवण्याचे काम सुरु असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला आहे. मी मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीच्या वेळीच त्यांना सर्व सांगितले होते. राज्य सरकारच्या माध्यमातून या बाबत काहीच होणार नसल्याचा दावा पुन्हा एकदा राज ठाकरे यांनी केला आहे.मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांची सकाळीच भेट घेतली. यामुळे भाजप आणि मनसे यांच्यातील युतीची चर्चा सुरु झाली होती. या बाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, राज ठाकरे यांनी उत्तर देणे टाळले. आज मी राजकीय विषयवर बोलणार नाही. जेव्हा त्या विषयी बोलायचे, तेव्हा बोलणार असल्याचे राज ठाकरे म्हणाले. एकंदरीत त्यांनी या विषयावर कोणतेही भाष्य करणे टाळले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प करावा-सांस्कृतिक कार्य मंत्री ना.श्री.सुधीर मुनगंटीवार

पोंभूर्णा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण

महाराजांचे १३ वे वंशज खासदार, श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांची विशेष उपस्थिती

चंद्रपूर । प्रतिनिधी

गरिबांना न्याय मिळावा, रयतेचे राज्य निर्माण व्हावे, यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी संघर्ष केला. स्वराज्य स्थापनेसाठी लढा दिला. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचे आदर्श आहेत. त्यामुळे आज येथे महाराजांच्या पुतळ्याची स्थापन होत असताना आपली जबाबदारी वाढली आहे. कोणावरही अन्याय होणार नाही आणि होऊ देणार नाही असा संकल्पच या निमित्ताने आपण करायचा आहे, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी केले. पोंभूर्णा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण सोमवारी झाले. त्यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार बोलत होते.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीतर्फे आयोजित या सोहळ्याला छत्रपती शिवाजी महाराजांचे १३ वे थेट वंशज तथा राज्यसभा खासदार उदयनराजे भोसले यांची विशेष उपस्थिती होती. तर भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, भाजपा ज्येष्ठ नेते चंदनसिंग चंदेल, जिल्हाधिकारी विनय गौडा, पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन,माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, सुहासराजे शिर्के येशुबाई फाऊंडेशन, जिल्हा महामंत्री डॉ. मंगेश गुलवाडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा संध्याताई गुरूनुले, महिला मोर्चा प्रदेश महामंत्री अल्काताई आत्राम, नगराध्यक्ष पोंभुर्णा सुलभाताई पिपरे, अजित मंगळगिरीवार, ऋषी कोटरंगे, दर्शन गोरंटीवार,आदी मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती. या पुतळ्यासाठी स्वर्गीय गजानन गोरंटीवार अतिशय प्रयत्नशील होते, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. 'अनेक दिवसांपासून येथील नागरिकांची छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची मागणी होती. ती मागणी पूर्ण करण्याचे सौभाग्य मला लाभले आणि पुतळ्याच्या अनावरणासाठी थेट महाराजांचेच वंशज छत्रपती उदयनराजे भोसले आज पोंभुर्णा येथे आले. त्यामुळे आज पोंभुर्णा वासियांसाठी अतिशय आनंदाचा दिवस आहे. छत्रपती उदयनराजे भोसले नेहमी साताऱ्यातच शिवजयंती साजरी करतात. या दिवशी ते इतर ठिकाणी जात नाहीत. मात्र आज पुतळ्याच्या अनावरण्यासाठी ते पोंभुर्णा येथे आले आहेत. त्यांच्या रूपाने शिवाजी महाराजांचा आशीर्वादच आपल्याला मिळाला आहे,' असे ना.सुधीर मुनगंटीवार म्हणाले. १२ मे १६६६ रोजी आग्रा येथील ज्या लाल किल्ल्यामध्ये औरंगजेबाने छत्रपतींना शेवटच्या रांगेत उभे केले होते, तेव्हा छत्रपतींनी वाघाची डरकाळी फोडली. आज त्याच दरबारात शिवजयंती साजरी करण्यात येत आहे. छत्रपती उदयनराजे हे सुद्धा तेथे उपस्थित राहतील, असे ना. मुनगंटीवार यांनी सांगितले. शिवकालीन दांडपट्टा आजपासून राज्यशस्त्र म्हणून घोषित करण्यात येणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. सिंदखेडराजाचा उत्कृष्ट असा विकास आराखडा तयार होत असल्याचे ना. मुनगंटीवार म्हणाले. छत्रपती शिवरायांचे १२ गड किल्ले आणि मराठा लष्कर स्थापत्य याचा प्रस्ताव युनेस्कोमध्ये पाठवण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. सुधीरभाऊंच्या प्रयत्नांतून आणि सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून एवढ्या मोठ्या प्रमाणावर शिवजयंती साजरी होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. शिवाजी महाराज हे जनतेचा विचार करायचे. आज लोक व्यक्ती केंद्रित झाल्याचे पाहायला मिळते. देशाची अस्मिता, अखंडता कायम ठेवायची असेल तर फक्त आणि फक्त छत्रपतींचा विचारच एकसंघ ठेवू शकतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली सर्वधर्मसमभावाची भावना आपण आचरणात आणली पाहिजे. देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी केवळ घोषणाच केल्या नाहीत तर छत्रपती शिवाजी महाराजांचे विचारही आचरणात आणले. त्यामुळेच केंद्र आणि राज्यात विकासाचे पर्व बघायला मिळत आहे छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती धर्माचे लोक जोडले संपूर्ण समाज त्यांचे कुटुंब होते. आज पोंभुर्णा येथे महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करताना अतिशय आनंद होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार मनात ठेवून भावी पिढीपर्यंत सुद्धा पोहोचवावे, असे आवाहन श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी केले.

शिवजयंती
च्या पावन पर्वावर
ती शिवाजी महा
रुढ पुतळ्याचा
अनावरण सो

'हे तर माझे भाग्य'

अफजलखानाच्या कबरीचे अतिक्रमण हटविण्याचे सौभाग्य आपल्याला लाभल्याचे ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले. 'भारत-पाक सीमेवर कुपवाडा येथे शिवाजी महाराजांचा पुतळा बसविला. वाघनखं भारतात आणण्यासाठी लंडनसोबत सामंजस्य करार करण्यात आला असून पुढील काही महिन्यातच वाघनखे येतील. शिवाजी महाराज हे सर्वांसाठी आदर्श आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर औरंगजेबाने महाराष्ट्राकडे आपला मोर्चा वळवला, मात्र येथील मावळ्यांनी औरंगजेबाला याच भूमीत दफन केले. औरंगजेबाने संभाजी महाराजांवर ४० दिवस अतोनात अत्याचार केले. त्यांचे केस काढले, नखं काढली, डोळे फोडले. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या दिवशी म्हणजेच १७ सप्टेंबर २०२३ ला औरंगाबादचे नाव छत्रपती संभाजीनगर ठेवण्याचे भाग्य ही मला लाभले,' अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

आपण सारेच महाराजांचे वारस – श्रीमंत छत्रपती श्री. उदयनराजे भोसले

'❝ पोंभुर्णा येथे येण्याचा मनापासून आनंद आहे. सुधीरभाऊ आमचे थोरले बंधू असून केवळ मी एकटाच छत्रपतींचा नाही तर आपण सर्वजण छत्रपतींच्या विचारांचे वारसदार आहोत,' असे खासदार श्री. उदयनराजे भोसले म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज हे अन्याय दूर करण्यासाठी लढले तर इतर राजांनी केवळ आपले साम्राज्य वाढविण्यासाठी लढा दिला. आज संपूर्ण देशात छत्रपतींची प्रतिमा देवघरात ठेवली जाते. राज्य चालविण्यात लोकांचा सहभाग असावा, रयतेचे राज्य असेच छत्रपती नेहमी म्हणायचे. लोकशाहीचा मूळ गाभाच त्या काळात शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून दाखवून दिला, असेही ते म्हणाले.

मातंग समाजातील उमेदवारांकरीता विविध कर्ज योजना

११ मार्चपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

चंद्रपूर । प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहे. या महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील कुटुंबाची सामाजिक, आर्थिक उन्नती व्हावी. त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध व्हावी, या उद्देशाने तसेच सर्वसामान्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी महामंडळाने नाविन्यपूर्ण योजना सुरू केल्या आहेत. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ तळागळापर्यंत व शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्यासाठी नाविन्यपूर्ण योजना एन.एस.एफ.डी.सी अंतर्गत सुरू झालेल्या आहेत.

या आहेत योजना : १)सुविधा कर्ज योजना : प्रकल्प मर्यादा ५ लाखापर्यंत. लाभार्थी उद्दिष्ट २५ पर्यंत राहील. २)महिला समृद्धी योजना:- प्रकल्प मर्यादा १ लाख ४० हजार पर्यंत. लाभार्थी उद्दिष्ट २० पर्यंत राहील. ३)शैक्षणिक कर्ज योजना : देशांतर्गत शिक्षणासाठी ३० लाख, परदेशांतर्गत शिक्षणासाठी ४० लाख अनुज्ञेय राहील. योजनेअंतर्गत प्राप्त होणारे कर्ज प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात सादर करावे. लाभार्थ्यांनी https://beta.slasdc/org. ह्या संकेतस्थळावर ऑनलाइन स्वरूपात अर्ज करावे. अर्ज केल्यानंतर ३ प्रतीत मूळ कागदपत्रासह महामंडळाच्या कार्यालयात सादर करावेत. सदर कर्ज प्रस्ताव स्वीकारण्याची अंतिम मुदत ११ मार्च २०२४ पर्यंत आहे.आवश्यक कागदपत्रे : अर्जदाराच्या जातीचा दाखला, उत्पन्न दाखला (उत्पन्न मर्यादा ३ लाखापर्यंत. तहसीलदार यांच्याकडून घेतलेला असावा), पासपोर्ट फोटो, राशनकार्ड, आधारकार्ड, मतदान कार्ड, आधारकार्डशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक, अर्जदाराचे शैक्षणिक प्रमाणपत्र तसेच ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा असेल त्या जागेच्या उपलब्धतेबाबतचा पुरावा, त्या जागेची भाडे पावती, करारपत्र किंवा मालकी हक्काचा पुरावा, एन.एस.डी.सी. योजनेखाली वाहन खरेदी करण्यासाठी ड्रायव्हिंग लायसन्स व आरटीओ कडील प्रवासी वाहतूक परवाना, वाहनाचे दरपत्रक, व्यवसाय संबंधित तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभवाचा दाखला, व्यवसायससंबंधी प्रकल्प अहवाल, खरेदी करावयाच्या मालाचे/साहित्याचे कोटेशन, यापूर्वी महामंडळाच्या योजनेचा व अन्य इतर शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा याबाबत प्रतिज्ञापत्र तसेच कर्ज मंजुरीनंतर कर्ज परतफेडीच्या हमीसाठी २ सक्षम जमानतदार आवश्यक राहील.कर्ज मंजुरीनंतर २ सक्षम जामीनदारांच्या वैधानिक दस्ताऐवजांची पूर्तता केल्यावरच कर्ज वाटप करण्यात येईल. सदर कर्ज योजनेचा लाभ मातंग समाजातील लाभार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक एस.व्ही. राचर्लावार यांनी केले आहे.

माता महाकाली कॉलेज ऑफ नर्सिंग,वरोरा येथे भावी परिचारिकांचा शपथविधी सोहळा संपन्न

वरोरा । प्रतिनिधी

MATA MAHAKALI BAHU-UDDESHIYA SHIKSHAN PRASARAK MANDAL, CHANDRAPUR
MATA MAHAKALI COLLEGE OF NURSING
LAMP LIGHT
&
OATH TAKIN
CEREM

महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैधक शिक्षण मंडळ, मुंबई द्वारा मान्यताप्राप्त माता महाकाली कॉलेज ऑफ नर्सिंग, वरोरा येथे नुकताच जीएनएम प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींचा स्वागत व शपथग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सचिन साधनकर, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. खुजे वैदयकिय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, वरोरा ,प्रवीण बाभुळकर प्राचार्य, माता महाकाली तंत्रनिकेतन वरोरा, बावणे विभागप्रमुख माता महाकाली कॉलेज ऑफ फार्मसी, वरोरा तसेच संस्थेच्या पल्लवी अमृतकर व शाम पिंपळे उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते मिस फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तद्वंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रा. प्रतीक नगराळे यांनी शपथ दिली. सदरील कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन करताना डॉ. खुजे यांनी नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या व परिचारकांचे वैद्यकीय क्षेत्रातील महत्त्व पटवून सांगितले. कार्यक्रमामध्ये बाभुळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. शिल्पा कर्वे यांनी केले. सूत्रसंचालन आचल तुमराम व आभार प्रदर्शन प्रतीक्षा खोब्रागडे या विद्यार्थिनींनी केले. या कार्यक्रमास माता महाकाली ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटयूशनच्या सर्व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

रयतेचे राज्य निर्माण करण्याचा संकल्प करूया !

सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत शिवजयंती साजरी

चंद्रपूर । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण देशाचे आराध्य दैवत असून आपल्या सर्वांसाठी छत्रपती हे ऊर्जा केंद्र आहे. लढण्याची शक्ती देण्याचे नाव म्हणजे शिवाजी महाराज होय. त्यामुळे छत्रपतींच्या विचारांचे स्मरण करून रयतेचे राज्य निर्माण करण्याचा आपण सर्वजण संकल्प करूया, असे आवाहन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

गिरनार चौक येथे जिल्हा प्रशासन व चंद्रपूर महानगर पालिकेच्या वतीने आयोजित शिवजयंती महोत्सवात ते बोलत होते. यावेळी मंचावर जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., महानगराचे अध्यक्ष राहुल पावडे, जिल्हा महामंत्री डॉ. मंगेश गुलवाडे, महानगराचे महामंत्री रामपाल सिंग, सूरज पेदुलवार, प्रज्वलंत कडू, किरण बुटले, महिला मोर्चा अध्यक्ष महानगर सविता कांबळे, युवा मोर्चा अध्यक्ष महानगर विशाल निंबाळकर ,मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपविभागीय अधिकारी रंजित यादव, तहसीलदार विजय पवार आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वप्नातील रयतेचे राज्य निर्माण करण्यासाठी आपण काय योगदान देऊ शकतो, याचा विचार करण्याचा आजचा दिवस आहे, असे सांगून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, तत्कालीन परिस्थितीत जनतेवर अत्याचार वाढत होते, त्यावेळी माँ जिजाऊच्या पोटी १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरीवर एक सूर्य जन्माला आला. छत्रपती शिवाजी महाराज स्वत:साठी नाही तर समाजासाठी जगले. त्यांनी राजमहल बांधला नाही, तर अभेद्य गडकिल्ले बांधले. मंत्री मुनगंटीवार पुढे म्हणाले, 'जय भवानी, जय शिवाजी' जल्लोषाने संपूर्ण शरीरात चैतन्य निर्माण होते. संपूर्ण राज्यात शिवजयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यासाठी शासन निर्णय काढला. शिवाजी महाराजांनी अठरापगड जातींचा विचार केला. न्यायासाठी लढणारे छत्रपती शिवाजी महाराज आपल्या सर्वांचे राजे होते. शिवजयंती केवळ एक दिवस नाही तर या दिवशी उर्जा घ्यायची आणि उर्वरीत ३६४ दिवस रयतेचे राज्य आणण्याचा संकल्प करायचा. आपण कोणत्याही जातीचे, वंशाचे, धर्माचे असू, मात्र हृदयात केवळ शिवबा असू द्या, असे आवाहन त्यांनी केले. तत्पूर्वी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते शिव ध्वजारोहन करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी २६ दिवसांचा प्रवास करून १५ गडकिल्ले सर करणाऱ्या वैभव कोमलवार यांचा पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. छत्रपतींनी बांधलेले १२ गडकिल्ले आणि मराठा लष्कर स्थापत्य याचा प्रस्ताव युनेस्कोकडे वारसा म्हणून घोषित करण्यासाठी पाठविण्यात आला आहे. केंद्र शासनाकडे १२ राज्यातून ४०० च्या वर प्रस्ताव आले, मात्र देशगौरव,पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी गडकिल्ले आणि मराठा लष्कर स्थापत्याचा प्रस्ताव निवडला आणि तो युनेस्कोच्या मान्यतेसाठी पाठविला आहे. यावर्षी युनेस्कोची मिटींग भारतात आहे. जागतिक वारसा म्हणून शिवरायांचे गडकिल्ले आणि मराठा लष्कर स्थापत्य याला मानांकन मिळेल, असा आशावाद मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. शिवजयंतीचे औचित्य साधून चंद्रपूर महानगर पालिकेच्या वतीने माँ जिजाऊ व छत्रपतींची वेशभुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात माँ जिजाऊ आणि बाल शिवाजीच्या वेशभुषेत असलेली शालेय मुले गिरनार चौकापासून गांधी चौकापर्यंत रस्त्याच्या बाजुला उभी राहून 'जय भवानी, जय शिवाजी' असा जल्लोष करीत होती. त्यांच्या गर्जनेने सर्व परिसर दुमदुमला. यावेळी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी बालकांचे विशेष कौतुक केले. तसेच उत्कृष्ट आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाचेही अभिनंदन केले.

प्रतिपच्च
द्रलेखेव वर्धिष्णु
र्वंदिता राजमुद्रा
शिवराजस्य

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .